# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सायंकाळ)

जा.क्र. ४२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक:—१९/०७/२०१६.

**१) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन मारहान व दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०७/२०१६ रोजी १८.३०. वा. दर. फिर्यादी हे कन्हाळगाव बिटमध्ये अर्ज चौकशी व पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी रब्बुल खान वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष, रा. खरबी नाका नागपुर व त्यांचे इतर ३ साथीदार हे चारही आरोपीतांनी संगनमत करुन पो. कॉ. नंदनवार ब. न. १२८६ यांना ढकलढुकल केले व त्यांच्या ओठावर ठोसा मारुन जानीवपुर्वक दुखापत करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केली. असे फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३३२,३२३,५०४,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) उपचारा दरम्यान मृत्यु . :—**

दिनांक १८/०७/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील मृतक विनोद रतीराम भिवगडे यास टिबीचा आजार असुन तो दारुपाणी पिल्या नंतर कोठेही निघुन जात होता. मृतक हा अडयाळ येथील साई मेडीकल जवळ बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यास ग्रा. रु. अडयाळ येथे नेले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केले. असे फिर्यादी विनायक विनोद भिवगडे वय ३४ वर्ष, रा. पालोरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शेख पो.स्टे. अडयाळ हे करीत आहे.

**३) ईलेक्ट्रीक करंट लागल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १८/०७/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील मृतक पंकज दामोधर मानापुरे वय ३२ वर्ष, रा. राम नगर राजेन्द्र वार्ड भंडारा याची शेत जमीन जमनी शिवारात टाकळी येथे असुन मृतक हा शेतामध्ये ईलेक्ट्रीक मोटारपंप चालु करण्याकरीता मेन ईलेक्ट्रीक लाईनवर वायर घालुन मोटार सुरु करीत असतांना ईलेक्ट्रीक करंट लागुन मरण पावला. असे फिर्यादी दामोधर नरहरी मानापुरे वय ६२ वर्ष, रा. राम नगर राजेन्द्र वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शेख पो.स्टे. अडयाळ हे करीत आहे.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

19/7/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.